POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-२९९ ● मुंबई, सोमवार, ०१ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

पुण्यात विषारी दारुच्या घटनेनंतर महाराष्ट्रात मध्यरात्री सर्वात मोठी छापेमारी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे झालेल्या भीषण दुर्घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग खडबडून जागा झाला आहे. या घटनेतील मृतांचा आकडा सातत्याने वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर राज्यभरात अवैध दारु अड्ड्यांविरुद्ध युद्धपातळीवर धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. पुणे ग्रामीणसह सांगली आणि नागपूर जिल्ह्यात गेल्या ४८ तासांत शेकडो छापे टाकून हजारो लिटर दारू आणि रसायन नष्ट करण्यात आले आहे.

पुण्यात मृत्यूचे तांडव; भिवंडीत धागेदोरे, ५,९२९ लिटर मेथेनॉल जप्त

पिंपरी-चिंचवड आणि पुण्यात विषारी दारू पिऊन मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वाढत आहे. फुगेवाडी आणि उरुळी कांचन भागात शनिवारी आणखी तिघांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने तातडीने सूत्रे हलवत पुणे आणि पिंपरी



परिसरात ४,४८० लिटर गावठी दारू जप्त केली. तर दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे सुमारे ४२,००१ लिटर घातक रसायन जागेवरच नष्ट केले. या प्रकरणी आतापर्यंत ५२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या विषारी दारूचे धागेदोरे ठाणे जिल्ह्यातील भिवंडीपर्यंत पोहोचले आहेत. अन्न व औषध प्रशासनाने भिवंडीतील एका गोदामावर शुक्रवारी मध्यरात्री छापा टाकून तब्बल ५,९२९ लिटर मेथेनॉलचा साठा जप्त केला. पुण्यात विषारी दारू तयार करण्यासाठी याच मेथेनॉलचा पुरवठा करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

मुळशी तालुक्यात पोलिसांचा बडगा

पुणे ग्रामीणमधील मुळशी तालुक्यात अवैध दारूच्या व्यवसाय समोर आले आहेत. पौड पोलिसांनी रिहे, कातरखडक, घोटावडे, माले, आंबवणे, भादस, मुठा आणि करमोळी परिसरात सलग दोन दिवस कोम्बिंग ऑपरेशन राबवले. यादरम्यान दुर्गम भागात चालणाऱ्या १० ते १२ हातभट्टी दारूच्या भट्ट्या पोलिसांनी पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या आहेत.

सांगलीत जेसीबीच्या साहाय्याने हातभट्टी केली जमीनदोस्त

पुण्यातील घटनेचे तीव्र पडसाद सांगली जिल्ह्यातही उमटले आहेत. सांगलीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने माधवनगर ते कर्नाळ रस्त्यावरील ओढ्याकाठी सुरू असलेल्या एका मोठ्या हातभट्टीवर धडक कारवाई केली. पोलिसांनी थेट जेसीबीच्या साहाय्याने ही हातभट्टी उद्ध्वस्त केली. या कारवाईत ७५० लिटर दारूचे रसायन आणि इतर साहित्य नष्ट करण्यात आले. पोलिसांचा सुगावा लागताच दोन संशयित आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

नागपुरात ४३ ठिकाणी धाडी; ५६ जणांवर गुन्हे दाखल

विदभार्ची राजधानी नागपूरमध्येही शहर आणि ग्रामीण पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. नागपूर शहर आणि ग्रामीण भागातील तब्बल ४३ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून ५६ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हिंगणा, कामठी, कोराडी आणि एमआयडीसी परिसरात ही करावाई करण्यात आली. यात नागपूर शहर पोलिसांनी तहसील ठाण्याच्या हद्दीतील टिमकी कोलबा स्वामी वाचनालयाजवळ आणि गिट्टीखदान परिसरातून दारू विक्री करणाऱ्या महिला आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर गावठी, देशी दारू आणि सडवा जप्त करण्यात आला आहे.

बळी गेल्यानंतरच पोलिसांची झोप उडते का? नागरिकांचा सवाल

एकीकडे पोलीस प्रशासन या कारवाईचे आकडे सादर करत असले, तरी सामान्य नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. नागपूर आणि पुण्याच्या स्थानिक नागरिकांनी थेट सवाल उपस्थित केला आहे. अनेक वर्षांपासून हे अवैध धंदे पोलिसांच्या नाकाखाली सुरू होते, मग पुण्यात १९ निष्पाप लोकांचा बळी जाईपर्यंत पोलीस ढिम्म का होते? आधीच कारवाई का केली गेली नाही? असा सवाल केला जात आहे. दरम्यान सध्या राज्यभरात सुरू असलेल्या या कारवाईमुळे अवैध दारू माफियांचे धाबे दणाणले असले, तरी ही मोहीम अशीच सुरू राहणार की काही दिवसांत पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' होणार, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

राज्यातील 12 जिल्ह्यांना पावसाचा इशारा

कुठे कसं असणार वातावरण?

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यातील हवामानाचा अंदाज पुन्हा एकदा बदलताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांसाठी मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला असून, काही ठिकाणी जोरदार वारे आणि वीजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तवली आहे.

मुंबईमध्ये आज मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

मुंबईत पहाटेच्यावेळी हलक्या पावसाच्या सरी बरसल्याने उकाड्यापासून हैराण मुंबईकराना काही अंशी दिलासा मिळाला आहे. मुंबईसह कल्याण, डोंबिवली, ठाण्यात पावसाच्या सरी बरसल्या असल्याने मान्सून पूर्व पावसाची चाहूल लागली आहे. विकेंडला पडलेल्या पावसामुळे सकाळच्या सत्रात बाहेर पडणाऱ्या मुंबईकरांची तारांबळ उडाली मात्र गारवा अनुभवायला मिळाला आहे. प्रादेशिक हवामान विभागाने आज, रविवारी सकाळी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरणाचा इशारा दिला आहे, तर दुपारनंतर हलक्या पावसाची किंवा गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे हा अंदाज खरा ठरून उकाड्यातून काहीशी सुटका होण्याची आशा महामुंबईतील रहिवाशांना आहे.

कोणत्या जिल्ह्यांना अलर्ट?

अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ या भागांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असून, विजांच्या कडकडाटासह वातावरण अस्थिर राहू शकते.

महाराष्ट्रात खरा मान्सून कधी येणार?

दक्षिण-पश्चिम मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या राज्यासाठी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. यंदा मान्सूनच्या प्रगतीचा वेग काहीसा मंदावल्याचे निरीक्षण हवामान तज्ज्ञांनी नोंदवले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मान्सून दाखल होण्यास किंचित विलंब होऊ शकतो. मात्र हा विलंब फार मोठा नसून जूनच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यातील बहुतांश भाग मान्सूनच्या प्रभावाखाली येण्याची शक्यता आहे.

कोकण किनारपट्टीवर मुसळधार पावसाची चिन्हे

मान्सून सक्रिय झाल्यानंतर कोकण, मुंबई महानगर परिसर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता आहे. या काळात वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांचा धोका वाढू शकतो. समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असल्याने मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

अरबी समुद्रातील घडामोडींवर लक्ष

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील वातावरणीय बदलांमुळे देशातील अनेक भागांतील हवामानात वेगाने बदल होत आहेत. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक आणि केरळच्या किनारी भागांत येत्या काही दिवसांत पावसाच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

१ जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये



■मुंबई । प्रतिनिधी,

सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावीः

- शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये
- विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे

साताऱ्यात 5 किलो गांजा तर नागपुरात 7 किलो ड्रग्ज जप्त... गुन्हे शाखेची मोठी कारवाई

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यात अंमली पदार्थ विरोधी कारवायांना जोर आला असून पोलिसांनी ड्रग्ज, गांजा तस्करीविरुद्ध मोहीमच हाती घेतली आहे. त्यातच, पुण्यात विषारी दारु, हातभट्टीमुळे 22 जणांचा जीव गेल्यामुळे राज्यभरातील पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर आली असून कारवाईला वेग आला आहे. त्यातूनच, नागपुरात तब्बल 7 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आलं असून साताऱ्यातही 4 किलो 69 ग्रॅम गांजा पोलिसांनी जप्त करुन आरोपींना अटक केली आहे. नागपूरच्या



जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दी 7 किलो एमडी ड्रग्स जप्त करण्यात आल्याने पोलीस कारवाईचं स्वागत होत आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

नागपूरमध्ये एकीकडे 7 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले असून दुसरीकडे सातारा जिल्ह्यातील फलटणमध्ये स्थानिक गुन्हे शाखा आणि फलटण शहर पोलिसांनीही मोठी कारवाई केली आहे. सातारा पोलिसांनी दोन संशयितांच्या ताब्यातून तब्बल 4 किलो 69 ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. मोटारसायकल आणि दोन मोबाईलसह एकूण 2 लाख 1 हजार 725 रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. रावरामोशी पुलाजवळ सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कारवाई पार पडली असून अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी पुन्हा एकदा मोठा दणका दिला आहे.

नागपूरमध्ये ड्रग्ज जप्त

नागपूरच्या जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीत 7 किलो एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले आहे. बाजार मुल्यानुसार 7 कोटी किमतीचे हे ड्रग्स अज्जू नावाच्या आरोपीने बाहेरून विकायला आणले होते, अशी माहिती आहे. त्यासाठी, आरोपीने एडीपील सोसायटी परिसरात भाड्याने फ्लॅट घेतला होता. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर पोलिसांनी ही कारवाई केली असून तब्बल 7 कोटी रुपयांचे ड्रग्ज ताब्यात घेतले आहे.

मंत्रालयालयातील कर्मचारी असल्याची बतावणी केली अन् पाच फ्लॅटमागे 60 लाखांचा गंडा घातला

■मुंबई । प्रतिनिधी,

म्हाडाच्या पाच फ्लॅटसाठी सुमारे 60 लाखांचा अपहार करून पळून गेलेल्या एका भामट्याला मालाड पोलिसांनी अटक केली आहे. जतीन बाबू सोलंकी असे या आरोपी भामट्याचे नाव असून तो अनेकांना मंत्रालयातील महसूल विभागातील कर्मचारी असल्याची बतावणी करून गंडा घालत असल्याचे उघडकीस आले आहे. अटकेनंतर त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 69 वर्षांची तक्रारदार महिला ही मालाड परिसरात राहते. तर नालासोपारा येथे राहणारा आरोपी जतीन हा तिच्या परिचित असून ते एकमेकांना गेल्या 23 वर्षांपासून ओळखतात. त्यामुळे जतीन हा नियमित तक्रारदार महिलेच्या घरी येत होता. सहा वर्षांपूर्वी जतीन अचानक महिलेच्या घरी येणे बंद झाला होता. त्यानंतर तो एप्रिल 2025 मध्ये महिलेच्या घरी आला होता. त्यावेळी त्याने महिलेला सांगितले की, तो मंत्रालयातील महसूल विभागात कामाला असून त्याच्याकडे म्हाडासंबंधित काम येते. तसेच आरोपी जतीनला पीडित महिलेचे कुर्ला पाईपलाईनमधील तीन झोपड्या पाण्यात वाहून गेल्याची



माहिती होती. या झोपड्याच्या मोबदल्यात महिलेला तीन फ्लॅट तसेच इतर दोन फ्लॅट स्वस्तःत देतो असे जतीनने सांगितले होते. तसेच पीडित महिलेचा विश्वास बसावा म्हणून जतीनने तिला गोरेगाव येथील डी मार्टसमोरील सिग्मा टॉवर इमारतीच्या पंधराव्या मजल्यावरील 1501, 1502 आणि 1503 क्रमांकाचे फ्लॅट दाखविले होते.

जतीनवर विश्वास ठेवून पीडित महिलेने त्याला पाच फ्लॅटसाठी 15 लाख कॅशसहीत 47 लाख 47 हजार रुपये बँक ट्रान्स्फर केले होते. अशा प्रकारे पीडित महिलेने पाच फ्लॅटसाठी जतीनला एकूण 60 लाख 47 हजार रुपये दिले. तसेच नोव्हेंबर 2025 रोजी जतीनने पीडित महिलेला फ्लॅटचे ॲलोटमेंट घेण्यासाठी एमएमआरडीए कार्यालयाजवळ बोलाविले होते. मात्र मंत्रालयातील एक महत्त्वाची फाईल चोरीस गेल्याची बतावणी करून तो त्याठिकाणी आलाच नाही. त्यानंतर जतीन विविध कारण सांगून महिलेला टाळण्याचा प्रयत्न करत होता. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच पीडित महिलेने मालाड पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी जतीनविरुद्ध अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच दीड महिन्यांपासून फरार असलेल्या जतीनला पोलिसांनी बुधवारी (27 मे) अटक केली. याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत आहे. मंत्रालयातील महसूल विभागात कामाला असल्याची बतावणी करून त्याने अशाच प्रकारे इतर काही गुन्हे केल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे त्याची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

वांद्रे 'गरीब नगर' कारवाईचा बदला घेण्यासाठी मुंबईत दहशतवादी हल्ल्याचा कट

■नाशिक। प्रतिनिधी,

काही दिवसांपूर्वी मुंबईतील वांद्रे पूर्व भागात रेल्वे स्टेशनजवळील गरीब नगरमधील अतिक्रमणावर हतोडा पडला. अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत पाच दिवसात जवळपास 400 हून अधिक अवैध बांधकामं जमीनदोस्त करण्यात आले. त्यानंतर आता महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईचा बदला घेण्यासाठी दहशतवादी हल्ल्याची तयारी करण्यात आली होती. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उघडकीस आला आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केलेल्या तपासात ही अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक माहिती समोर आली आहे.

पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा होत्या लक्ष्यावर

अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींच्या चौकशीतून अनेक गंभीर खुलासे झाले आहेत. या दहशतवाद्यांच्या निशाण्यावर प्रामुख्याने मुंबईतील पोलिस कर्मचारी, सुरक्षा यंत्रणा आणि शहरातील काही अतिमहत्त्वाची व गदीर्ची ठिकाणे होती. पोलिसांवर हल्ला करून आणि महत्त्वाच्या ठिकाणी स्फोट घडवून शहरात दहशत पसरवण्याचा यामागे मुख्य उद्देश होता.

फोटो, व्हिडिओ आणि विदेशी चॅट्स जप्त

दिल्ली स्पेशल सेलने अटक केलेल्या आरोपींकडून अत्यंत महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. या आरोपींच्या मोबाईल आणि इतर उपकरणांमधून मुंबईतील विविध ठिकाणांचे रेकॉर्ड केलेले व्हिडिओ आणि फोटो जप्त करण्यात आले आहेत. यावरून त्यांनी शहराची रेकी (टेहळणी) केल्याचे स्पष्ट होते. तसेच,



त्यांचे परदेशात बसलेल्या त्यांच्या 'हँडलर्सशी' झालेले चॅट्सही (संभाषण) तपास यंत्रणांच्या हाती लागले आहेत, ज्यावरून या कटाची व्याप्ती आणि गांभीर्य समोर आले आहे.

आयएसआय आणि मुन्ना झिंगाडा रडारवर

या दहशतवादी कटाची पाळेमुळे थेट सीमेपार पोहोचलेली आहेत. पाकिस्तानस्थित गुप्तचर संस्था 'आयएसआय' आणि कुख्यात गुंड मुन्ना झिंगाडा यांच्यासह इतर काही प्रमुख विदेशी सूत्रधारांचा या कटात मोठा सहभाग असल्याचा संशय आहे. या विदेशी हँडलर्सच्या इशाऱ्यावरच आणि आर्थिक मदतीवर मुंबईत हा कट शिजत होता. सध्या तपास यंत्रणा या सर्व मुख्य सूत्रधारांच्या भूमिकेचा सखोल तपास करत आहेत.

मुंबई पोलिस आणि महाराष्ट्र एटीएस 'हाय अलर्ट'वर

हा मोठा आणि भयंकर कट उघडकीस आल्यानंतर मुंबई पोलिस दल आणि महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक अत्यंत सतर्क झाले असून त्यांना 'हाय अलर्ट'वर ठेवण्यात आले आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, संशयित हालचालींवर बारीक नजर ठेवली जात आहे. या दहशतवाद्यांना स्थानिक पातळीवर कुणी मदत केली होती का? त्यांना राहण्यासाठी किंवा रेकी करण्यासाठी कोणी रसद पुरवली? यासाठी 'स्लीपर सेल' आणि लोकल नेटवर्कचीही कसून चौकशी सुरू आहे.

दुकानाबाहेर बेवारस बॅग, पोलीस धावले

मुंबईचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. मुंबईत एका दुकानाच्या बाहेर बेवारस बॅग सापडल्याने खळबळ उडाली आहे. ही माहिती मिळताच पोलीसही अलर्ट झाले आहेत. पोलीस यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली आहे. बॉम्ब निरोधक पथकाला पाचारण करण्यात आलं असून पथक येईपर्यंत हा परिसर सील करण्यात आला आहे. मुंबईच्या भुलेश्वर परिसरात एक बेवारस बॅग सापडली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. या बॅगेबद्दल माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. एका दुकानाबाहेर ही बॅग ठेवण्यात आली. बॉम्बशोधक पथक घटनास्थळी दाखल झाले. बॉम्ब शोधक पथकाकडून बॅगची तपासणी करण्यात आली. या बॅगेबद्दल पोलिसांनी परिसरातील नागरिकांनी माहिती दिली. मुंबईचा हा भुलेश्वर परिसर अत्यंत वर्दळीचा परिसर आहे. याच परिसरात ही बॅग सापडल्याने तपास यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या. ही बॅग नक्की कोणी आणून ठेवली, याचाही शोध घेतला जात आहे. मोठ्या संख्येने पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांकडून पूर्ण परिसर रिकामा करण्यात आला आहे. याबाबत बोलताना पोलिसांनी म्हटले की, अगोदर आम्ही तपास करत आहोत. मुंबई पोलिस खात्यातील महत्वाचे अधिकारीही घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांचे प्रत्येक परिस्थितीवर बारीक नजर आहे. नागरिकांना या परिसरात न थांबण्याच्या सूचनाही पोलिसांकडून दिल्या गेल्या. पोलिसांनी काही वेळातच पूर्ण परिसर रिकामा केला. भुलेश्वर मार्केट परिसरात सापडलेली बॅग पूर्णपणे रिकामी असल्याची माहिती मिळत आहे. बॅगेत काहीही आढळले नसल्याचे तपासणीनंतर स्पष्ट झाले. इतक्या वर्दळीच्या परिसरात अशाप्रकारे बेवारस बॅग सापडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेने मुंबई अलर्ट मोडवर आहे. पोलिस सर्तक झाले आहेत. मुंबईचा भुलेश्वर परिसर म्हणजे अत्यंत वर्दळीचा आहे. तिथे लोकांची मोठ्या संख्येने गर्दी असते. एका अज्ञात इसमाने रिकामी बॅग ठेवली असल्याचे आले समोर. बॅगमध्ये काहीही नसून बॅग पूर्ण रिकामी.

शिक्षकाचे आठवीच्या विद्यार्थीनीसह भयानक कृत्य!

सर्व प्रकार पाहून पोलिसही शॉक झाले, पण शाळा व्यवस्थापनाला काहीच माहित नाही

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकचे धर्मांतरम प्रकरण ताजे असताना एक अत्यंत धक्कादायक प्रकार घडला आहे. येथील एका नामांकित संस्थेच्या इंग्रजी माध्यमातील अल्पवयीन विद्यार्थिनीचे अश्लील व्हिडिओ काढून अल्पवयीन विद्यार्थिनीवर वारंवार अत्याचार केला आहे. शिक्षकानेच हे कृत्य केले आहे. या नराधम शिक्षकाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शाळा व्यवनस्थापनला या प्रकारबाबत काहीच माहित नव्हते. मन्सूर सादिक मनियार असे आरोपा शिक्षकाचे नाव आहे. या शिक्षकाने इयत्ता आठवीतील अल्पवयीन विद्यार्थिनीवर विज्ञान प्रदर्शनाच्या बहाण्याने बाहेरगावी नेऊन गैरवर्तन करत अश्लील फोटो व व्हिडिओ आपल्या मोबाईल मध्ये चित्रीत केले. या शिक्षकाने वारंवार अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी संबंधित शिक्षकाचे निलंबन करण्यात आले असून या शिक्षकाला वडनेर भैरव पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे



नेमकं काय घडलं?

11 नोव्हेंबर 2025 रोजी शिक्षक मन्सूर सादिक मनियार याने विज्ञान प्रदर्शनासाठी फक्त दोन मुलांना परवानगी असताना संस्थेची पूर्व परवानगी न घेता मुलींच्या पालकांना खोटे सांगून दोन मुलींना सोबत घेऊन गेला. येथे या शिक्षकाने मुलींवर लैंगिक अत्याचार करून एका मुलीचे चित्रीकरण देखील केले तेव्हापासून वारंवार या मुलीला चित्रीकरण व्हायरल करण्याची धमकी देऊन वारंवार तिच्यावर अत्याचार करत राहिला. शिक्षकाच्या अत्याचाराला कंटाळलेल्या या मुलीने याची माहिती आपल्या पालकांना दिली. यावेळी संतप्त झालेल्या पालकांनी शाळेमध्ये जात संबंधित शिक्षकाला जाब विचारण्याचा प्रयत्न केल्यानंतर या गंभीर घटनेचा उलगडा झाला. या गंभीर घटनेची माहिती दोन ते तीन दिवसांपूर्वी शाळेतील प्राचार्य व संस्थाचालकांना माहिती झाली असून सुद्धा कुठलीही कारवाई न झाल्याने शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक आणि ग्रामस्थांनी संतप्त होत शाळेवर धडक देऊन ठिय्या आंदोलन केले. यावेळी ग्रामस्थांनी हे प्रकरण लव जिहाद असून संबंधित शिक्षकावर कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत या या ठिकाणाहून हटणार नसल्याची भूमिका घेतली होती. शाळेचे संस्थेचे सरचिटणीस यांनी शिक्षक मन्सूर सादिक मनियार याला कायमस्वरूपी सेवेतून निलंबित केले आहे. या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी व ग्रामस्थांनी शाळेवरती ठिय्या आंदोलन करून गोंधळ घातल्याने तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याने या ठिकाणी पोलिसांचा मोठा फौज फाटा देखील तैनात करण्यात आला आहे.

दरम्यान पालकांच्या आणि ग्रामस्थांच्या रेट्यानंतर मन्सूर सादिक मणियार या शिक्षकावर वडनेर भैरव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली आहे.



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक


बळी प्रथेच्या माध्यमातून इस्लामचे वाढते प्रस्थ!



मुंबईमध्ये 'बकरी ईद'च्या निमित्ताने १० सहस्रांहून अधिक पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला होता. सार्वजनिक ठिकाणी प्राणी हत्या न करण्याविषयी सर्वोच्च न्यायालय, तसेच उच्च न्यायालये यांनी वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. 'बकरी ईद' आली की, काही दिवस आधीपासून 'सोसायट्यांमध्ये प्राणी हत्या करण्यात येऊ नयेत', यासाठी मागील काही वर्षांपासून मुंबई महानगरपालिका प्रतिवर्षी परिपत्रके काढत आहेच. या कशालाही भीक न घालता मुसलमान मात्र त्यांची धर्मांधता सोडायला सिद्ध नाहीत. न्यायालयाचे निर्देश धाब्यावर बसवून आणि प्रशासनाला न जुमानता मुंबईतील सोसायट्यांमध्ये बकरी ईदच्या दिवशी सर्रासपणे बळी दिला जातो. मागील २ दिवसांपासून मुंबई पोलिसांनी अनेक सोसायट्यांमध्ये जाऊन शेकडो बोकड कह्यात घेतले. मीरा-भाईंदर येथे तर एका-एका सोसायटीतून १२-१५ बोकड बाहेर काढण्यात आले. याचे व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाले आहेत. ईदच्या आधी आठवडाभर बोकड आणून सोसायटीच्या आवारातच त्यांच्यासाठी पत्र्याची शेड बांधली जाते. आठवडाभर त्यांना चारा-पाणी देऊन ईदच्या दिवशी त्यांच्या गळ्यावरून सुरा फिरवला जातो. त्याचा सोसायटीमधील अन्य रहिवाशांना त्रास होतो. त्यापेक्षाही बोकड कापून त्यांच्या रक्ताचा सडा सोसायटीच्या परिसरात पडल्यामुळे आणि त्यांचे अवशेष उघड्यावर टाकल्यामुळे पुढील काही दिवस सोसायटीमध्ये अत्यंत दुर्गंध येण्यासह कुबट वास पसरतो. हा प्रकार आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत हानीकारक आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सव, दिवाळी, होळी, रंगपंचमी, दसरा अशा हिंदूंच्या सर्वच सणांच्या वेळी प्रदूषणाची जे टिमकी वाजवत असतात, ते कथित पुरोगामी अन् हिंदी चित्रपटसृष्टीतील तथाकथित पर्यावरणप्रेमी या वेळी मुंबईत सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या प्राण्यांच्या हत्यांविषयी आणि त्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी तोंड उघडायलाही सिद्ध नाहीत. ईदला कापण्यासाठी आणलेल्या बोकडांसाठी मुंबईतील सार्वजनिक ठिकाणी असलेली झाडे आणि बागांमधील झाडांचा पाला मुसलमानांनी ओरबाडून नेला. सार्वजनिक ठिकाणी बोकड कापणे अन् त्यांचे अवयव उघड्यावर फेकणे, हा सर्व प्रकार म्हणजे सामाजिक दायित्वाविषयी असंवेदनशीलताच आहे. अन्य रहिवाशांची पर्वा न करता मुंबईतील सोसायट्यांमध्ये वर्षानुवर्षे बकरी ईदच्या दिवशी प्राण्यांच्या हत्या केल्या जात आहेत. मागील काही वर्षांत यांविषयी मुंबई महानगरपालिकेकडे सहस्रो तक्रारी येऊनही हे प्रकार रोखण्यासाठी ठोस कारवाई झालेली नाही. ईदच्या दिवशी सोसायट्यांमध्ये प्राणी न कापण्याविषयी परिपत्रक काढण्याचा सोपस्कार मात्र प्रशासन करते आणि काही पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवल्या जातात अन् पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या', असे प्रकार वर्षानुवर्षे चालू आहेत. न्यायालय, प्रशासन यांना न जुमानता चालू असलेली ही धर्मांधता, म्हणजेच मुसलमानांचा उद्दामपणा होय. हा उद्दामपणा वेळीच रोखला नाही, तर येत्या काळात मुसलमानांची धर्मांधता केवळ मुंबईतील सोसायट्यांमधील बळी देण्यापुरती मर्यादित रहाणार नाही, तर भारताच्या इस्लामीकरणाची एक प्रक्रिया आहे. सोसायट्यांमध्ये अन्य समाजाचे नागरिक असूनही तेथे बकऱ्यांसाठी मोठमोठ्या शेड बांधणे एवढ्यापुरताच हा उद्दामपणा मर्यादित नाही. ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील दुर्गाडी गडावर हिंदवी स्वराज्यासाठी आरमार बांधण्याला प्रारंभ झाला. त्या दुगार्डी गडावरील 'श्री दुर्गादेवीचे मंदिर हे मशीद असल्याचा दावा करणे, गडावर असलेली भिंत 'ईदगाह' असल्याचा दावा करणे', या माध्यमातून मुसलमान येथे मागील अनेक वर्षांपासून बकरी ईद आणि रमजान ईद या दिवशी रस्ता अडवून नमाजपठण करतात. वर्ष २०२५ मध्ये महाराष्ट्राचे विधीमंडळाचे अधिवेशन चालू असतांना विधानभवनाच्या बाजूचा पादचारी मार्ग अडवून नमाजपठण करणे, हे मुसलमानांच्या उद्दामपणाचेच लक्षण आहे. वरवर हा धार्मिक विधी वाटत असला, तरी त्याच्या निमित्ताने शक्तीप्रदर्शन आणि त्याद्वारे भारतात इस्लामचे प्रस्थ वाढवण्याचा हा प्रकार आहे. मुंबईमधील सोसायट्यांमध्ये बोकड कापण्याचा हा प्रकारही इस्लामचे प्रस्थ वाढवण्याचाच प्रकार आहे. बकरी ईदच्या दिवशी प्राण्यांच्या हत्या उघडपणे चालू असल्यामुळे हा स्वतःचा धार्मिक अधिकार असल्याचे मुसलमानांना वाटायला लागले आहे. काही दिवसांपूर्वी वांद्रे रेल्वेस्थानकाच्या बाजूला ४० वर्षांहून अधिक काळ अवैधरित्या वसवण्यात आलेली बेसुमार झोपडपट्टी प्रशासनाने हटवली. त्या वेळी झोपडपट्ट्यांमधील मुसलमानांचा आक्रोश वारंवार प्रसारित करून माध्यमांनी मुसलमानांना पीडित दाखवण्याचा प्रयत्न केला. अवैध बांधकामाला चुकीचे ठरवण्याऐवजी त्यावरील कारवाई कशी अमानवीय आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न केला. मुसलमानांनी दंगा केला, बलात्कार केले, हत्या केल्या, तरीही त्यांना पीडित दाखवण्याची मानसिकता भारतामध्ये वर्षानुवर्षे निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे देशातील जिहादी कारवायांमध्ये, तसेच गुन्हेगारीमध्ये मुसलमानांचा उच्चांक सर्वाधिक असला, तरीही त्यांच्याविषयी माध्यमांद्वारे सहानुभूती निर्माण केली जाते अन् त्यांची गुन्हेगारी वृत्ती झाकली जाते. यापूर्वी काँग्रेसच्या राजाश्रयामुळे माध्यमांचा जणू हा अजेंडाच झाला होता; परंतु वांद्रे येथील कारवाईविषयी मुसलमानांना पीडित दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या माध्यमांनाच नागरिकांनी समाजमाध्यमांवर फैलावर घेतले. त्यामुळे वर्षानुवर्षे देशात चालू असलेल्या मुसलमानांच्या लांगूलचालनाविषयी हिंदु समाज आता सतर्क होत आहे. मुंबईत बकरी ईदच्या निमित्ताने पोलीस आणि प्रशासन यांनी एकत्रित केलेली ही कारवाई येर्णाया काळासाठी एक धडा ठरेल, अशी आशा आहे. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असूनही त्याचे उल्लंघन सर्रासपणे चालू आहे. हे प्रकार पोलिसांच्या साहाय्याविना अशक्य आहेत. लव्ह जिहादच्या अनेक घटना राज्यात सातत्याने घडत आहेत; मात्र तक्रार करूनही त्याविषयी पोलिसांकडून ठोस कारवाई केली जात नाही. सरकार, पोलीस आणि प्रशासन यांनी ठरवले, तर मुसलमानांची धर्मांधता ठेचणे अवघड नाही; पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात भाजप-शिवसेना या हिंदुत्वनिष्ठ पक्षांचा समावेश असलेले शासन हिंदूंच्या बहुमताने सत्तेत आले आहे. काँग्रेस सरकारच्या काळात अल्पसंख्यांक मुसमलमानांना सर्वच क्षेत्रांत झुकते माप दिले गेले. राजाश्रय दिला. मुसलमानांच्या उद्दामपणाचे मूळ यातच आहे. 'मुसलमान' म्हणून कुणावर अन्याय होऊ नये; मात्र त्यांचा उद्दामपणा आणि धर्मांधता ह्यअल्पसंख्यांकह्न म्हणून गोंजारण्याची चूक सरकारकडून न होणे श्रेयस्कर ! मुंबईप्रमाणे मुसलमानांचा सर्वच स्तरांवरील उद्दामपणा सरकारने मोडीत काढावा.

पेपरफुटी हा तर राष्ट्रद्रोही कट

समाज घडविण्यासाठी शिक्षण व्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक असते, परंतु पेपर फोडण्यासारखे घोटाळे करणे आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडविणे हा देशद्रोही कटाचा भाग मानला पाहिजे.



एखाद्या सार्वजनिक व्यवस्थेचे रूपांतर खासगी मालकी व्यवस्थेमध्ये करायचे असेल तर सर्वात महत्त्वाचा भाग कोणता असतो, तर त्या सार्वजनिक व्यवस्थेला सतत बदनाम करणे आणि सामान्य लोकांचा त्या व्यवस्थेवरून विश्वास उडविण्यासाठी साम-दाम-दंड-भेद वापरून कुणाचीही पर्वा न करता वाट्टेल ते करत सुटणे, हे होय. एकदा ती सार्वजनिक व्यवस्था खिळखिळी झाली की मग खासगी मालकांच्या ताब्यात देणे सोपे असते. हा प्रयोग शिक्षण व्यवस्थेबाबत फार पूर्वीपासून सुरू आहे. लाखो रुपये घेऊन कोचिंग क्लासेस चालविणे, पेपर लीक करणे, श्रीमंताच्या मुलांना सहज सोप्या होतील अशा पद्धतीने परीक्षांचे नियोजन करणे, लाखो रुपये घेऊन मेरिटचे क्रमांक बदलविणे, सार्वजनिक शाळा-महाविद्यालये बंद करणे या सर्व घटनांमुळे सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास उडून खासगी व्यवस्था बळकट होत जाते.

आज परिस्थिती इतकी बदलली आहे की शिक्षण हा हक्क नसून 'बाजारातील माल' बनला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाने या वास्तवावरचा पडदा पूर्णपणे फाडून टाकला आहे. सीबीआयकडून प्राध्यापक, कोचिंग क्लास चालक, एजंट आणि इतर संबंधितांना अटक होत आहे, परंतु हा केवळ फार्स ठरणार आहे. या सर्व घटनांनी एक मूलभूत प्रश्न निर्माण होत आहे की, भारतात शिक्षण व्यवस्था उभी आहे की शिक्षणाचा बाजार? गेल्या काही दशकांत भारतातील शिक्षण क्षेत्रावर खासगीकरण आणि बाजारपेठेचा प्रभाव प्रचंड वाढला. विशेषतः वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण हे मोठ्या गुंतवणुकीचे क्षेत्र बनले. आज कोचिंग क्लासेस हजारो कोटींचे उद्योग झाले आहेत, 'सिलेक्शन रेट' आणि 'रँक' हेच शिक्षणाचे मापदंड झाले आहेत, विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या आर्थिक क्षमतेला महत्त्व दिले जाऊ लागले. महागडे कोचिंग, टेस्ट सिरीज, खास बॅच, डिजिटल कोर्सेस यामध्ये लाखो रुपये खर्च करणाऱ्यांनाच स्पर्धेत टिकण्याची संधी मिळते. नीटसारख्या परीक्षांभोवती संपूर्ण 'कोचिंग इकॉनॉमी' उभी राहिली आहे. अनेक शहरांमध्ये शिक्षणापेक्षा कोचिंग उद्योगाचे वर्चस्व दिसते. अवास्तव यशकथा दाखवून पालकांना आकर्षित करणे, 'टॉपर फॅक्टरी'ची प्रतिमा निर्माण करणे, शिक्षणाला यांत्रिक स्पर्धेत बदलणे. लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनणारे विद्यार्थी पुढे भव्य हॉस्पिटल उभारून फार्मा कंपन्यांशी संगनमत करून रुग्णांच्या जीवाशी पैशाचा खेळ खेळतात, असे चित्र आपण रोज पाहत आहोत. पैसा असलेल्यांनाच उपचार मिळतात हे हरघडी आपण पाहतो. सार्वजनिक किंवा सरकारी शाळा-महाविद्यालयांत 'शिक्षकांची पुरेशी संख्या सुनिश्चित करण्या'बाबत आश्वासन देणारे सरकार प्रत्यक्षात त्याच्या उलट काम करत आहे.

केरळ सरकारने पीएचडीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो केवळ एक सरकारी आदेश नाही, तर ती एका पिढीमध्ये केलेली गुंतवणूक आहे. जेव्हा शिक्षण मोफत होते, तेव्हा गरीबातील गरीब कुटुंबातील मुलाचे डॉक्टर किंवा संशोधक होण्याचे स्वप्न केवळ पैशांअभावी अपुरे राहत नाही. हे धोरण सामाजिक विषमता संपवण्याच्या दिशेने टाकलेले सर्वात मोठे पाऊल आहे. महाराष्ट्रात कमी पटसंख्या हे तांत्रिक कारण पुढे करून जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचे किंवा त्यांचे एकत्रीकरण करण्याचे धोरण राबविले जात आहे, अशा परिस्थितीत सार्वजनिक शिक्षण व्यवस्था बळकट कशी होईल?

नुकत्याच झालेल्या नीट-यूजी २०२६ परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. हा निर्णय लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मानसिक धक्क्यापेक्षा कमी नव्हता. या विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या कुटुंबांनी अनेक महिने किंबहुना अनेक वर्षे, या एका परीक्षेमुळे भविष्यातील चांगल्या आयुष्याचे दार उघडेल या आशेवर आयुष्य रोखून ठेवले होते. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याच्या आशेने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या असून हजारो विद्यार्थी मानसिक नैराश्याशी झुंज देत आहेत. प्रश्नपत्रिका फुटीचे हे प्रकरण आता अनेक शहरांमध्ये पसरलेल्या घोटाळ्याचे रूप घेताना दिसत आहे. पुढील वर्षापासून नीट-यूजी परीक्षा पेन-पेपर पद्धतीऐवजी संगणकावर ऑनलाइन घेतली जाईल, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले असले तरी उलट संगणकीय प्रणालीमध्ये घोटाळा करण्याचे अधिक गुप्त मार्ग आहेत. तंत्रज्ञानात पुढारलेल्या अनेक देशांनी ऑनलाइन परीक्षांचा मार्ग स्वीकारलेला नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पेपरफुटीला आळा घालण्यासाठी संगणकीय परीक्षा पर्याय होऊ शकत नाही, तर परीक्षा नियोजन व्यवस्था अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. ३ मे रोजी परीक्षा दिलेल्या सुमारे २२.०५ लाख विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क महत्त्वाचे नाही, तर परीक्षा व्यवस्था विद्यार्थ्यांकडून आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून मोठी किंमत वसूल करते. नुकतेच किशोरवयातून बाहेर पडलेल्या मुला-मुलींना देशातील कोटा, सीकर, प्रयागराज तर महाराष्ट्रातील नांदेड, लातूर यांसारख्या शहरांतील 'कोचिंग फॅक्टरी'मध्ये पाठवले जाते. ते मित्रांपासून दूर जातात. त्यांची दिनचर्या विस्कळीत होते आणि ते शारीरिक तसेच मानसिक समस्यांशी झुंज देतात. गेल्या दोन-तीन वर्षांत शासकीय पदे आणि प्रवेशांशी संबंधित किमान १६ महत्त्वाच्या परीक्षा स्थगित कराव्या लागल्या होत्या. २०२५ मध्ये शिक्षणविषयक संसदीय स्थायी समितीने नमूद केले की, २०२४-२५ या कालावधीत एनटीएने घेतलेल्या १४ स्पर्धा परीक्षांपैकी किमान पाच परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटी आणि निकाल प्रक्रियेतील त्रुटींसारख्या गंभीर समस्या आढळल्या. सर्वात गंभीर बाब म्हणजे नीट-यूजी प्रथमच अशा घोटाळ्यात अडकलेली नाही.

महाराष्ट्रातील अनेक वैद्यकीय महाविद्यालये थेट राजकीय नेत्यांच्या संस्थांच्या ताब्यात आहेत. एकीकडे सरकार सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या अपुरी ठेवते, तर दुसरीकडे खासगी संस्थांना परवानगी देत असते. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांसमोर पर्याय उरतो तो फक्त प्रचंड शुल्क भरून शिक्षण घेण्याचा. सामान्य शेतकरी, कामगार किंवा मध्यमवर्गीय कुटुंबासाठी हे शुल्क म्हणजे आयुष्यभराचे कर्ज असते. शिक्षणाचे बाजारात रूपांतर झाले की, गुणवत्ता तर संपतेच, शिवाय माणुसकीही हरते. लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनणारा विद्यार्थी पुढे ते पैसे वसूल करण्याचाच विचार करतो. परिणामी, आरोग्य व्यवस्थाही व्यापारी बनते. रुग्ण हा माणूस न राहता ग्राहक बनतो आणि उपचार ही सेवा न राहता व्यवहार ठरतो. म्हणूनच शिक्षणातील व्यापारीकरणाचा परिणाम केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण समाजव्यवस्थेवर होतो. 'नीट'चा मूळ उद्देश काय होता? देशभरातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया एकसमान करणे, गुणवत्तेला प्राधान्य देणे आणि भ्रष्टाचार रोखणे. प्रत्यक्षात झाले नेमके उलटे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यांच्या आर्थिक क्षमतेची चाचणी घेणारी ठरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, मराठी माध्यमातील विद्यार्थी, राज्य मंडळातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुले या व्यवस्थेत अक्षरशः चिरडली जात आहेत. शिक्षण हा मूलभूत हक्क की विक्रीयोग्य वस्तू (कमोडिटी) म्हणून दुकानाच्या शोकेसमध्ये ठेवले गेले आहे.

शिक्षण आनंददायी न राहता भीती, ताण आणि असुरक्षिततेचा खेळ बनला आहे. पालकांच्या अपेक्षा, कोचिंग क्लासेसची जीवघेणी स्पर्धा आणि जाहिराती, दिवसाला दहा-दहा तास अभ्यास आणि अपयशाची भीती, या सगळ्यांत विद्यार्थी मानसिकदृष्ट्या कोलमडत आहेत. कोटा, पुणे, लातूर यासारख्या शिक्षण केंद्रांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत.


याशिवाय सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा उरतो की आपण आपल्या विद्यार्थ्यांसमोर काय वाढून ठेवले आहे. केवळ डॉक्टर, इंजिनिअर बनणे म्हणजे उत्तम आयुष्य जगणे होय अशी भावना विद्यार्थी आणि पालकांची जाणीवपूर्वक तयार करण्यात आली आहे. शिक्षणाच्या बाजारीकरणाची ही व्यवस्था विद्यार्थ्यांच्या मुळावर येत आहे. समाज घडविण्यासाठी शिक्षण व्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक असते, परंतु पेपर फोडण्यासारखे घोटाळे करणे आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडविणे हा देशद्रोही कटाचा भाग मानला पाहिजे. पेपर फोडणाऱ्यांना कठोर शासन करायला हवे. नीट पेपरफुटीच्या प्रकरणावरून आता शिक्षण व्यवस्थेचा थातूरमातूर इलाज करून चालणार नाही, तर थेट 'सर्जरी' करावी लागणार आहे. त्याखेरीज हा बट्ट्याबोळ संपणार नाही.



भारतीय रेल्वेची धडाकेबाज योजना

गेल्या काही वर्षांमध्ये देशात औद्योगिक उत्पादन, कोळसा वाहतूक, बंदरांमधील मालवाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्यामुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वे खासगी क्षेत्राच्या सहभागातून सहा नवीन रेल्वे प्रकल्प उभारण्याच्या योजना राबवत आहे. हा निर्णय भारतीय रेल्वेच्या धोरणात्मक बदलाचे संकेत देणारा मानला जात आहे. दीर्घकाळ भारतीय रेल्वेचा विस्तार मुख्यतः सरकारी निधीवर आधारित होता; मात्र वाढत्या लोकसंख्येचा दबाव, औद्योगिक वाढ आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी पाहता केवळ सरकारी निधीवर रेल्वेचा विस्तार करणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारसमोर आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि शहरी पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत रेल्वे क्षेत्रात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी मिळवलेल्या सहा प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने मालवाहतुकीसाठीचे रेल्वे कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. चार कोळसा वाहतूक कॉरिडॉर, एक बॉक्साइट वाहतूक मार्ग आणि एक लोखंड धातू वाहतूक कॉरिडॉर या योजनांमध्ये समाविष्ट आहेत. या सर्व प्रकल्पांची एकत्रित लांबी सुमारे ६४० किलोमीटर असेल. हे मार्ग विशेषतः खाण, ऊर्जा आणि अवजड उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. भारतातील वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात कोळशावर आधारित आहे. देशातील अनेक वीज प्रकल्पांना वेळेवर कोळसा पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. स्वतंत्र मालवाहतूक कॉरिडॉर उभारल्यास कोळसा वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होऊ शकते. त्याचप्रमाणे बॉक्साइट आणि लोखंड धातू वाहतुकीमुळे स्टील आणि धातू उद्योगालाही मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पांची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ते सार्वजनिक-खासगी भागीदारी अर्थात ह्यपीपीपीह्न मॉडेलवर उभारले जाणार आहेत. रेल्वे क्षेत्रात याआधीही 'पीपीपी' मॉडेलचे प्रयोग झाले होते; पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नव्हते. खासगी कंपन्यांनी गुंतवणुकीबाबत फारसा उत्साह दाखवला नव्हता. यामागील प्रमुख कारण म्हणजे मोठा आर्थिक धोका, जमीन अधिग्रहण आणि दीर्घकालीन परताव्याबाबतची अनिश्चितता. या वेळी मात्र रेल्वे मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल केले आहेत. सर्वप्रथम, प्रकल्पांचा सवलत कालावधी ५० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजे खासगी कंपन्यांना दीर्घकाळ महसूल मिळवण्याची संधी असेल. दुसरे म्हणजे, जमीन अधिग्रणाची जबाबदारी रेल्वे स्वतः घेणार आहे. भारतात पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण हा सर्वात मोठा अडथळा मानला जातो, त्यामुळे गुंतवणूकदारांवरील धोका कमी होईल. सरकार ह्यव्हायेबिलिटी गॅप फंडिगह्न मॉडेलही वापरणार आहे. या अंतर्गत प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य रहावेत, म्हणून सरकार प्रकल्प खर्चाच्या कमाल ४० टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत देईल. यामुळे खासगी क्षेत्रासाठी गुंतवणूक अधिक आकर्षक बनण्याची शक्यता आहे. हा निर्णय रेल्वेने ह्यमिशन ३०००ह्न अंतर्गत २०३० पर्यंत वार्षिक मालवाहतूक क्षमता ३००० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याच्या ध्येयाशी जोडला आहे. भारतात सध्या उद्योगक्षेत्राला उच्च लॉजिस्टिक्स खचार्चा सामना करावा लागतो, ज्याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या जागतिक स्पर्धात्मकतेवर होतो. रेल्वे मालवाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम झाल्यास उद्योगांच्या वाहतूक खर्चात मोठी बचत होऊ शकते. या प्रकल्पांमुळे बंदरे, खाण क्षेत्रे आणि औद्योगिक पट्टे यांना अधिक चांगली रेल्वे जोडणी मिळेल. 'मेक इन इंडिया' आणि उत्पादन क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीनेही ही गुंतवणूक महत्त्वाची ठरते; मात्र खासगीकरणाबाबत अनेक चिंता आणि प्रश्नही उपस्थित होतात. रेल्वे हा सार्वजनिक सेवाक्षेत्राचा भाग आहे. त्यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढल्यास भविष्यात मालवाहतूक दर वाढतील का, नफ्यावर जास्त भर दिला जाईल का, याबाबत प्रश्न उपस्थित होतात. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय परिणाम. कोळसा वाहतुकीसाठी स्वतंत्र कॉरिडॉर उभारणे आर्थिकदृष्ट्या आवश्यक असले, तरी भारताने हरित ऊर्जेकडे वाटचाल करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यामुळे भविष्यात कोळशावरील अवलंबित्व कमी झाले तर अशा प्रकल्पांचे दीर्घकालीन आर्थिक गणित बदलू शकते. व्यापक पातळीवर पाहता भारतीय रेल्वे आता मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीला प्राधान्य देत देशात जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, बुलेट ट्रेन, स्टेशन पुनर्विकास आणि आता खासगी सहभागातून उभारले जाणारे नवे कॉरिडॉर या सर्व प्रकल्पांमधून रेल्वेचे स्वरूप बदलताना दिसत आहे. आर्थिक वाढ टिकवून ठेवायची असेल, तर मजबूत आणि आधुनिक वाहतूक व्यवस्था अपरिहार्य आहे. रेल्वे हा त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय गरजेचा मानला जाऊ शकतो; पण त्याच वेळी सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि दीर्घकालीन राष्ट्रीय गरजा यांचा समतोल राखणेही आवश्यक राहणार आहे.

राज्याच्या राजकारणात नवी उलथापालथ?



नवीन १६ विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. स्थानिक राजकारणाचे भविष्य यामुळे ठरणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा विधान परिषद निवडणुकीचे ढग दाटले आहेत. ही निवडणूक केवळ १६ जागा भरण्याची नाही, तर महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे संतुलन, विकासाचा प्राधान्यक्रम आणि सत्ताधारी महायुती विरुद्ध विरोधक महाविकास आघाडी यांच्यातील शक्तिपरीक्षण ठरणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे शेतकरी, सहकार, शहरी विकास आणि ग्रामीण समस्या विधान परिषदेत प्रभावीपणे मांडल्या गेल्या नाहीत. आता नवीन आमदारांकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

विधान परिषद ही राज्याची वरिष्ठ सभा असून, येथील सदस्य अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. राज्यातील ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडले जातात. यापैकी १६ जागा साडेचार वर्षांहून अधिक काळ रिक्त होत्या. आता निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

इतका उशीर का झाला?

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण विवाद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणे आणि न्यायालयीन प्रक्रिया यामुळे या जागा २०२२ पासून रिक्त राहिल्या. अनेक आमदारांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला, तर काही २०२४ मध्ये. यामुळे जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या विकासकामांना प्रतिनिधित्व मिळाले नाही. २०२५-२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्याने आता ७५ टक्के मतदार संख्या पूर्ण होऊन निवडणूक शक्य झाली आहे.

मतदारसंघ आणि मतदार संख्या

या निवडणुकीत सोलापूर (५९५), अहमदनगर (४६१), ठाणे-पालघर (१०५४), जळगाव (५२६), सांगली-सातारा (८५३), नांदेड (४३२), यवतमाळ (४०५), पुणे (७९८), भंडारा-गोंदिया (४५७), रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (९४७), नाशिक (५८१), वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली (९७७), अमरावती (४५३), धाराशिव-लातूर-बीड (१०५१), परभणी-हिंगोली (४६८), छत्रपती संभाजी नगर-जालना (५८०) आणि नागपूर (७६१) या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदार हे महापालिका नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती इत्यादी आहेत.

भूतकाळातील चित्र

या मतदारसंघांत पूर्वी राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात कडवी लढत झाली. सोलापूरमध्ये प्रशांत प्रभाकर परिचारक (भाजप समर्थित) यांनी शेतकरी मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली. पुण्यात अनिल शिवाजीराव भोसले (राष्ट्रवादी) यांचा काळ सहकार आणि शहरी विकासाशी जोडला गेला, मात्र घोटाळ्यांच्या चर्चेर्ने प्रभावित झाला. अहमदनगरमध्ये अरुणकाका जगताप, जळगावमध्ये चंदूभाई पटेल, अमरावतीमध्ये प्रवीण पोटे यांनी दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. मागील निवडणुकांत ९० टक्क्यांहून अधिक मतदान आणि काही ठिकाणी क्रॉस व्होटिंगमुळे अनपेक्षित निकाल लागले होते.

सध्याचे राजकीय समीकरण

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महायुती (भाजप, शिंदे सेना, अजित पवार गट) सत्तेत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप आणि सहयोगी पक्षांनी चांगली कामगिरी केली. यामुळे या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व राहण्याची शक्यता प्रबळ आहे. महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी श.प.) क्रॉस व्होटिंग टाळण्याचा आणि काही जागांवर आश्चर्य घडवण्याचा प्रयत्न करेल. अर्ज भरणे अद्याप सुरू नसल्याने अंतिम नावे स्पष्ट नाहीत, पण चर्चा जोरात आहे. महायुतीकडून स्थानिक जिल्हा परिषद संभाव्य उमेदवार आणि रणनीती अध्यक्ष, महापालिका नेते, सहकार क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींना संधी मिळण्याची शक्यता. ठाणे, पुणे, नाशिक, विदर्भात भाजपची मजबूत पकड. एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यात समन्वय साधला जाईल. मविआकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी (श.प.) सक्रिय असतील. काँग्रेस काही जागांवर सपोर्ट देऊ शकते. पुणे, नाशिक, सोलापूर, रायगड-सिंधुदुर्गसारख्या ठिकाणी तीव्र चुरस अपेक्षित आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात महायुतीची पारंपरिक ताकद असल्याने या जागा त्यांच्या हातच्या असतील. सध्या त्यांची लढत विरोधकांशी नसून आपापसातच आहे. भाजप सगळ्याच पक्षांपेक्षा वरचढ होण्याच्या तयारीत आहे, तर शिंदे आपला आब राखण्याच्या धडपडीत. सुनेत्रा वहिनी अद्याप चाचपडतायत. त्यांना सूर मिळण्यासाठी पटेल, तटकरे आणि पार्थ, जय यांच्यातली पक्ष ताब्यात घेण्याची स्पर्धा कमी व्हायला हवी.

यंदाची रंगत कशी असेल?

विधान परिषदेतील या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येणाऱ्या जागा चार-पाच वर्ष रिक्त राहिल्या. त्यामुळे विकास प्रक्रिया मंदावली. पूर्वीच्या आमदारांनी शेतकरी संकट, पाणी वाटप, सहकार क्षेत्र, शहरी विकास, शिक्षण आणि आरोग्य या मुद्द्यांवर आवाज उठवला. विधान परिषदेत उपस्थिती आणि प्रश्न विचारण्याची संख्या मर्यादित उपलब्ध असते, पण क्षेत्रीय कामे महत्त्वाची ठरतात. नवीन आमदारांनी पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन स्थानिक प्रश्न सोडवावेत अशी जनतेची अपेक्षा असते. दीर्घकाळ या जागा रिक्त राहिल्याने पाणी, रस्ते, सिंचन, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, पीकविमा यांसारख्या समस्या प्रलंबित राहिल्या. मात्र आता या मागार्ने आमदारकीचा आणि विकासाचा मार्ग खुला झाला आहे. ही निवडणूक तशीही महायुतीसाठी सोप्पी आहे. कारण महायुतीचे स्थानिक संस्थांमधील बहुमत. यामुळे १२ ते १४ जागा सहज मिळू शकतात. दुसरे, मविआची एकजूट आणि क्रॉस व्होटिंग टाळण्याची रणनीती. तिसरे, मुख्य मुद्दे शेतकरी संकट, पाणी-रस्ते, सहकार घोटाळे, बेरोजगारी, शहरी-ग्रामीण असमतोल, महिला, दलित, ओबीसी आणि आदिवासी प्रतिनिधित्व. चौथे, आर्थिक प्रलोभने, आंतरिक असंतोष आणि अपक्ष उमेदवारांचा धोका. पुणे आणि ठाण्यात शहरी विकास व सहकार, विदर्भात भाजपची पारंपरिक ताकद, मराठवाड्यात राष्ट्रवादी-शिवसेना स्पर्धा, कोकणात स्थानिक नेते निर्णायक आणि पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी-बहुजन राजकारण प्रभावी राहील, असा अंदाज आहे. ७५ टक्के मतदार उपस्थिती अपेक्षित राहील असे वाटतेय. लक्ष्मीदर्शन कार्यक्रम बिनदिक्कतपणे पार पडला तर मतदान १००% होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निवडणुकीचे राजकीय परिणाम

या १६ नवीन विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी (जुलै २०२६) शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. ही निवडणूक महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे भविष्य ठरवणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे जनतेच्या समस्या मागे राहिल्या. नवीन आमदारांनी विकास, पारदर्शकता आणि क्षेत्रीय प्रश्नांना प्राधान्य द्यावे. महायुतीचे वर्चस्व राहण्याची शक्यता जास्त असली तरी राजकारणात आश्चर्य नेहमी शक्य असते. मतदारांनी पक्षीय दबावाऐवजी विकासाचा विचार करावा. विधान परिषद अधिक सक्रिय, प्रतिनिधित्वपूर्ण आणि जनहितकारी बनवण्याची ही संधी आहे. ही निवडणूक महाराष्ट्राच्या लोकशाहीला नवी दिशा देईल का, हे २२ जूनला स्पष्ट होईल. निकाल लागल्यानंतर राज्याच्या राजकीय समीकरणात महत्त्वाचे बदल दिसतील एवढं मात्र निश्चित!

व्हेज खिमा रोल

साहित्य: सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



कृती: सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.

कित्येक शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.

जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामापेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

ॲप कसे काम करते?

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

डोळ्यात कचरा गेल्यावर करा 'हे' उपाय

डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदूषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहोचू शकते. वातावरणातील धूलिकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

▮सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.



▮डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.

▮डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असताना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरू नये.

▮डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

▮अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते, अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.

केस आणि त्वचेसाठी औषधी तेल



सध्या केसांच्या समस्या वाढताना दिसताहेत. प्रदूषणाचं प्रमाण वाढत असताना केस आणि त्वचेवर त्याचा स्पष्ट परिणाम दिसतो. मात्र केसांवर अधिक परिणाम दिसण्याची अनेक कारणं आहेत. सध्या केसांचं सौंदर्य आणि स्वच्छता राखताना अनेक रसायनयुक्त प्रसाधनांचा वापर वाढतोय. दर्जा न बघता खरेदी केलेली अशी प्रसाधनं केसांच्या मुळांनाच हात घालतात. तीव्र प्रसाधनांमुळे केसांची मुळं कमकुवत होतात, केसांचा पोत बिघडतो आणि तक्रारींची मालिका सुरू होते. यावर उपाय म्हणून आठवड्यातून एकदा किंवा दोनदा तेलाचा मसाज करणं हा पर्याय आहे. यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं, त्याचप्रमाणे डोकेही शांत राहतं. पण केवळ तेल पुरेसं नाही. काही उपायानं हे तेल अधिक उपयुक्त बनवता येऊ शकतं.



▮तिळाच्या तेलात मेथीदाणे भिजत घाला. आता हे तेल मंद आचेवर गरम होऊ द्या. तेल गार झाल्यावर गाळून मेथीदाणे बाजूला करा. आता हे तेल अधिक औषधी आणि परिणामकारक आहे.

▮केसांसाठी आवळ्याची उपयुक्तता आपण जाणतो. आवळे उकळवा. आता हे मऊसर आवळे कूकरमध्ये ठेवून चार-पाच शिट्या करा. आवळ्याचा गर निघेल. हा गर गाळून घ्या. आता या मिश्रणात हवं ते तेल एकत्र करा आणि अर्धा तास गरम करा. थंड झाल्यावर तेल बाटलीत भरून ठेवा. या तेलानं केलेला मसाज अधिक चांगला परिणाम देईल.

▮सुकलेला आवळा तेलात मिसळा. तेल उकळू द्या. थंड झाल्यावर आवळ्यासहित तेल बाटलीत भरा.

▮खोबरेल तेलात बदाम मिसळा आणि तेलाला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यानंतर तेलाचा रंग बदलेल. रंग बदलल्यावर तेल आचेवरून उतरवा आणि थंड झाल्यावर बाटलीत भरून ठेवा.

▮खोबरेल तेलात मेथीदाणे घालून चार-पाच दिवस तसेच ठेवा. त्यानंतर गाळून तेल बाटलीत घाला. हे तेल अधिक उपयुक्त झालेलं असेल.

पंचकर्म म्हणजे काय?

पंचकर्म ही आयुर्वेदाची एक वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा आहे. प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली ही उपचार पद्धती आहे. यामध्ये रोग बरा करण्यासाठी एखादे औषध देऊन शरीरातच तो रोग जिरवून न टाकता तो रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे रोग समूळ नष्ट होतो. अर्थात तो रोग पुन्हा डोके वर काढत नाही व रोग समूळ नष्ट होतो. अशा रीतीने रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याच्या प्रक्रियेला शोधन क्रिया म्हटले जाते. मात्र त्याचबरोबरच बृहन, लंघन, स्नेहन, रुक्षण, स्वेदन व स्तंभन हे सहा उपक्रमही केले जातात. परंतु पंचकर्म उपचारात वमन, विरेचन, बस्ती, नस्य व रक्तमोक्षण हे प्रमुख व अत्यंत महत्त्वाचे असे उपचार आहेत.



प्रत्येक रुग्णाला हे पाचही उपचार केलेच पाहिजेत, असे आवश्यक नाही. रुग्णाची प्रकृती, आतापर्यंत झालेली मोठमोठी आजारपणे, वय, कुठला ऋतू सुरू आहे या सर्वांचा विचार करून वैद्य रुग्णाला नेमका कुठला उपचार द्यायचा हे ठरवतात. पंचकर्मामध्ये वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे शोधन करायचे असते.

वात, पित्त व कफ हे तीन दोष संतुलित असतील तर कोणताही रोग होत नाही. मात्र यांच्यापैकी एखादाही दोष वाढला असेल, तर शरीरात रोग निर्माण होत असतो. हे तीन दोष वाढण्याच्यादेखील वेगवेगळ्या श्रेणी असतात. त्यानुसार उपचार निश्चित केला जातो. साधारणतः अन्न पचन न होणे, तोंडाला चव नसणे, स्थूलपणा, ॲनिमिया, जडत्व, अंग गळून जाणे, अंगावर पित्त उठणे, सर्वांगास कंप सुटणे, सर्व अंग जखडणे, कामात लक्ष न लागणे, अतिशय आळस येणे, थोडे श्रम करताच दम लागणे, अकारण अशक्तपणा येणे, सर्वांगास दुर्गंधी येणे, वारंवार कफ होणे, वारंवार पित्त होणे, निद्रानाश किंवा अतिशय झोप येणे, नपुंसकता येणे, वाईट स्वप्ने पडणे, शरीराचा वर्ण काळवंडणे ही लक्षणे दिसली तर पंचकर्म उपचार देणे अतिशय लाभकारक असते.

पंचकर्म उपचार करताना रोग्याची शक्ती पाहिली जाते. हे उपचार सोसण्याची ताकद रुग्णामध्ये असली पाहिजे. वात, कफ व पित्त हे तीन दोष शरीरात वाढले असतील. सर्व शरीरात पसरले असतील व ते साम अवस्थेत असतील तर ते दोष वाढलेले असूनदेखील पंचकर्माद्वारे तसेच्या तसे बाहेर काढता येत नाहीत. साम अवस्थेतील रोग्याचे शोधन केल्यास रोग्याला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पाचन, स्नेहन व स्वेदन हे तीन पूर्व उपचार केले जातात व तद्नंतर पंचकर्म उपचार केले जातात.

वैद्यांनी सांगितलेले पथ्य व इतर सूचनांचे पालन करणे शक्य नसेल, तर पंचकर्म करू नये आणि स्वतःच्या मनाने तर अजिबात करू नये. पंचकर्म उपचारांचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून काही सूचना लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अतिशय मोठ्या आवाजात बोलू नये. कुठल्याही वाहनाने प्रवास करू नये. जास्त चालू-फिरू नये. एकाच जागी जास्त बसून वा पडून राहू नये, अति खाणे किंवा अजीर्ण टाळावे. वैद्यांनी सांगितलेलाच आहार घ्यावा आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे.

पंचकर्माने रोग शरीरातून समूळ नष्ट होतो. परंतु काही इतरही याचे फायदे आहेत. शरीरात अग्नी प्रदिप्त होतो. शरीराला व मनाला स्वस्थता मिळते. इंद्रिये प्रसन्न होतात. मन व बुद्धी आपापल्या कार्यांमध्ये उत्कर्ष करतात. शरीराचा वर्ण व कांती उजळते. त्वचा तजेलदार दिसू लागते. कार्यशक्ती म्हणजे स्टॅमिना वाढतो. शरीर पुष्ट व भारदार होते. वृद्धावस्था लवकर येत नाही. संतती नसलेल्यांना संततीप्राप्ती होते. निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य मिळते. पंचकर्म उपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावा, त्याने दुष्पपरिणाम होत नाहीत. हे सर्व फायदे मिळवायचे असतील तर पंचकर्म उपचार वर्षातून किमान एकदा तरी करून घेतलाच पाहिजे.



पावसाळ्यात पाणी पिताना अशी घ्या काळजी...

दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते, तिथे तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...

पाणी गाळून घेणे

वॉटर प्युरिफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणीने पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चांगल्या सोसायटीमध्ये राहतो, त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते, असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.



उकळणे

पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीवजंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरून जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

तुरटी फिरवणे

तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

नळाला फिल्टर बसवणे

पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारे वेगवेगळे फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरू शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

वाहतुकीवर १२ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

बचाव पथके, हेल्पलाइन नंबर कार्यान्वित बीएमसीचा आपत्कालीन विभाग सज्ज

आपत्कालीन परिस्थितीत वेळीच मदत मिळावी, यासाठी बचाव पथके, हेल्पलाइन नंबर कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच पावसाळ्यात सखल भागात पाणी साचणे, वाहतूककोंडीवर तब्बल १२ हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. विशेष म्हणजे ५८ हॉटलाइन 'व्ही सॅटेलाइट' यंत्रणेच्या माध्यमातून कार्यरत करण्यात आल्या आहेत. एकूणच यंदाच्या पावसाळ्यासाठी मुंबई महापालिकेचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सज्ज झाला आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

आपत्कालीन परिस्थितीत मुंबईकरांना वेळीच मदत मिळावी, यासाठी बचाव पथके, हेल्पलाइन नंबर कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच पावसाळ्यात सखल भागात पाणी साचणे, वाहतूककोंडीवर तब्बल १२ हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. विशेष म्हणजे ५८ हॉटलाइन 'व्ही सॅटेलाइट' यंत्रणेच्या माध्यमातून कार्यरत करण्यात आल्या आहेत. एकूणच यंदाच्या पावसाळ्यासाठी मुंबई महापालिकेचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सज्ज झाला आहे.

पावसाळ्यात मुंबईकरांची गैरसोय होऊ नये यासाठी मुंबई महापालिकेसह संबंधित यंत्रणा सज्ज झाली आहे. समुद्रकिनारी, चौपाट्यांवर पावसाळ्यात कुठलीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पर्यटकांच्या मदतीसाठी लाईफ गार्ड, अग्निशमन दलाच्या जवानांसह सहा रेस्क्यू बोट, ४२ लाईफ जॅकेट आदी तैनात असणार आहेत. कुलाबा, वरळी, मालाड, मानखुर्द आणि घाटकोपर येथे नौदलाची पूर बचाव पथके तयर ठेवली आहेत.

आणीबाणीप्रसंगी त्वरित मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाच्या तीन तुकड्या अंधेरी क्रीडा संकुल येथे तैनात आहेत, तर भारतीय लष्कराचे १०० कर्मचारी आणि जवानही सज्ज ठेवण्यात आले आहेत.

रडार लेव्हल ट्रान्समिटर

मुंबईतील नद्या आणि तलावातील पाण्याच्या पातळीतील वाढ़ कळवण्यासाठी रडार लेव्हल ट्रान्समिटर लावण्यात आलेले आहेत. पाणी पातळीच्या वाढीची माहिती या ट्रान्समिटरद्वारे थेट मुख्य नियंत्रण कक्षास प्राप्त होईल. सखल वस्तीत राहणाऱ्यांच्या त्वरित स्थलांतराकरिता याचा वापर होतो.

भूस्खलनाच्या ठिकाणी आपत्ती पथके तैनात

भूस्खलनाची शक्यता असणाऱ्या कुर्ला 'एल' वॉर्ड, 'एन' वॉर्ड घाटकोपर आणि भांडुप 'एस' वॉर्डकरिता राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाच्या दोन तुकड्या १ जूनपासून तैनात करण्यात येणार आहेत. या ठिकाणी राहणाऱ्या स्थानिकाना आपत्ती व्यवस्थापणाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर काय करावे आणि काय करू नये याचे माहिती फलक संभाव्य ठिकाणी लावण्यात येत आहेत.



धोकादायक ठिकाणांची रेकी

मुंबई अग्निशमन दल, नौदल, लष्कर आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाचे अधिकारी व जवान संभाव्य पूर ठिकाणे, संभाव्य भूस्खलनाच्या ठिकाणांची आणि मोडकळीस आलेल्या इमारतींची मान्सूनच्या आधी रेकी करणार आहेत.

अशी आहे आपत्कालीन विभागाची सज्जता

- अतिमहत्वाच्या ६१ ठिकाणांसह संबंधित अधिकाऱ्यांच्या वाहनांत अत्याधुनिक डिजिटल मोबाईल रेडिओ प्रणाली
- १९१६ मदतसेवा क्रमांकाच्या ३० लाइन्स तत्पर
- शहर व उपनगरात पूरसदृश परिस्थितीप्रसंगी नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी एकूण २० जीवरक्षक तराफे
- पाणी उपसा करणाऱ्या उदंचन पंपचालकांसोबत समन्वयासाठी कंत्राटदारांचे प्रतिनिधी नियंक्षण कक्षात तत्पर
- डिझास्टर मॅनेजमेंट मुंबई महापालिका ॲप, संकेतस्थळ, ट्विटर हँन्डल,@mybmc, डिजिटल मोबाईल यंत्रणा उपलब्ध
- महापालिकेच्या २६ वॉर्डमध्ये प्रत्येकी पाच शाळा तात्पुरते निवारे म्हणून घोषित

जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांची खैर नाही! : तुकाराम मुंढे

3 दिवसांत 33 अटक, राज्यभरात 27 आस्थापनांना एफडीएचे टाळे



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा पदभार स्वीकारताच आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर सोमवारीच त्यांनी राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अवघ्या तीन दिवसांत अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर धडक कारवाया करत ३३ आरोपींना अटक केली असून २७ आस्थापनांना सील ठोकण्यात आले आहे. २५ ते २८ मेदरम्यान राबवण्यात आलेल्या या मोहिमेत भेसळखोर, प्रतिबंधित गुटखा विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर मोठ्या प्रमाणावर छापेमारी करण्यात आली. बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागांत कारवाया करण्यात आल्या.

कोणावर मोठी कारवाई

राज्यातील ५३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३४ ठिकाणी नियमभंग आढळून आला. याप्रकरणी २५ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. पाच वाहने जप्त करण्यात आली असून सुमारे २०.५७ लाख रुपयांचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. बृहन्मुंबई विभागात सर्वाधिक कारवाई झाली. येथे १९ आस्थापना सील करण्यात आली असून १९ जणांना अटक करण्यात आली आहे.

दूध, आंबे, आईस्क्रीमपासून नूडल्सपर्यंत तपासणी

या मोहिमेत केवळ गुटखाच नव्हे, तर पॅकबंद पिण्याचे पाणी, दूध, नूडल्स, खाद्यतेल, फरसाण, आईस्क्रीम, मसाले, खवा, पनीर, तूप, बेसन आणि बेकरी पदार्थांची तपासणी करण्यात आली. संशयित २८.७८ लाख रुपयांचा साठा जप्त करून नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

कुठे काय आढळलं?

जळगावमध्ये गायीच्या दुधात खाद्यतेल मिसळून कृत्रिम दूध तयार केल्याचा प्रकार उघडकीस आला. पुण्यात इथिलीन रसायनांचा वापर करून कृत्रिमरीत्या पिकवलेले आंबे जप्त करण्यात आले.

धुळे जिल्ह्यात अस्वच्छ वातावरणात मटर बेसन उत्पादन सुरू असल्याचे आढळले. धारावीत लेबलिंग नियमांचे उल्लंघन करून नूडल्स उत्पादन सुरू असल्याचे निदर्शनास आले. नाशिकमध्ये बनावट लेबलिंग आणि परवान्याशिवाय उत्पादन करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. तर पालघरमध्ये अस्वच्छ वातावरणात सुरू असलेल्या आईस्क्रीम उत्पादन केंद्रावर छापा टाकून लाखोंचा साठा जप्त करण्यात आला.

'आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही'

''जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. भेसळ, प्रतिबंधित पदार्थांची विक्री आणि असुरक्षित अन्न उत्पादनाविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असेल,'' असा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

दरम्यान, तक्रारी तत्काळ नोंदवता याव्यात यासाठी लवकरच नवीन मोबाईल ॲप आणि टोल-फ्री क्रमांक सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सरकारी कार्यालयातील महिलांच्या टॉयलेटमध्ये हिडन कॅमेरा...


■मुंबई। प्रतिनिधी,

एका सरकारी कार्यालयातील महिलांच्या स्वच्छतागृहात एक लपवलेला कॅमेरा आढळून आल्याने संपूर्ण कर्मचारी वर्गात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली, जेव्हा वित्त विभागातील महिला कर्मचारी या स्वच्छतागृहात गेल्या होत्या. तिथे त्यांना एक संशयास्पद उपकरण अचानक जमिनीवर पडलेले दिसले.

हे उपकरण पाहून त्यांना काहीतरी गंभीर प्रकार असल्याचे जाणवले आणि त्यांनी तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर कार्यालयात एकच खळबळ उडाली आणि घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी हे संशयास्पद उपकरण जप्त केले असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांच्या टीमकडून तांत्रिक पुराव्यांची तपासणी

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, पोलिसांनी तपास कायार्ला वेग दिला आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासले



जात असून, घटनेच्या वेळी संबंधित परिसरात कोणाची वर्दळ होती आणि कोणाच्या हालचाली संशयास्पद होत्या, याचा शोध घेतला जात आहे.


पोलीस या प्रकरणात अंतर्गत कोणाचे हात आहेत का, या शक्यता नाकारत नाहीत. या तपासामध्ये आता डिजिटल फॉरेंसिक टीमलाही सामील करण्यात आले आहे. हे जप्त केलेले उपकरण नेमके काय होते, त्यात काही रेकॉर्डिंग झाले होते का किंवा यातील डेटा कुठल्या बाह्य उपकरणावर ट्रान्सफर करण्यात आला होता का, याची पडताळणी फॉरेंसिक टीमकडून केली जात आहे. कार्यालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षेशी आणि गोपनीयतेशी झालेला हा खेळ अत्यंत निषेधार्ह मानला जात आहे. ओडिशातील जगतसिंहपूर जिल्ह्यात असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास संस्थेच्या कार्यालयातून हा अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

मुख्य आरोपीला लवकरच शोधून काढले जाईल, पोलिसांचे आश्वासन

तिरतोलचे एसडीपीओ यांनी या प्रकरणाबाबत माहिती देताना सांगितले की, तपास अधिक जलद गतीने करण्यासाठी एक विशेष तपास पथक गठीत करण्यात आले आहे. तांत्रिक पुरावे आणि फॉरेंसिक अहवालाच्या आधारे या कृत्यामागील मुख्य आरोपीला लवकरच शोधून काढले जाईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे. प्राथमिक तपासात स्वच्छतागृहाच्या जमिनीवर एक संशयास्पद उपकरणाचा भाग मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे, परंतु ते कोणाच्या सांगण्यावरून किंवा कशाच्या उद्देशाने तिथे लावले होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सरकारी कार्यालयातील सुरक्षा आणि कर्मचारी वर्गाच्या, विशेषतः महिलांच्या गोपनीयतेचा प्रश्न या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कार्यालयातील सुरक्षा व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची गरज कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

रुग्णालयाचं ड्रेनेज तुंबल्याने सफाई, पण भयंकर दृश्य दिसलं अन्...



प्रसुतीगृहाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

ही घटना प्रसूतीगृहाच्या अगदी जवळ घडल्यामुळे या प्रकरणाकडे संशयाने पाहिले जात आहे. विशेष म्हणजे, संबंधित प्रसुतीगृहामध्ये 23 तारखेपासून कोणतीही प्रसूती झाली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यामुळे हे अर्भक नेमके कुठून आले आणि कोठून आणून ड्रेनेजमध्ये टाकले गेले, हा तपासाचा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. एखादे अर्भक जन्मानंतर मृत झाले असावे आणि त्यानंतर कर्मचाऱ्यांनी त्याची योग्य विल्हेवाट न लावता थेट ड्रेनेज चेंबरमध्ये फेकून दिले असावे, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. जर हे अर्भक रुग्णालयातील असेल, तर या गंभीर हलगर्जीपणाबद्दल दोषींवर कडक कारवाईची मागणी केली जात आहे. पोलीस आता रुग्णालयातील रेकॉर्ड आणि सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत.

■सांगली । प्रतिनिधी,

सांगली जिल्ह्यातील मिरज शहरात एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. मिरज मार्केट परिसरातील महापालिका रुग्णालय आणि प्रसुतीगृहाच्या नजीक असलेल्या ड्रेनेज चेंबरमध्ये मृत अर्भक आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. हे पुरुष जातीचे अर्भक असून, त्याच्या शरीराला नाळ अजूनही जोडलेली होती.

या घटनेमुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, हे क्रूर कृत्य नेमके कोणी केले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. माहिती मिळताच मिरज शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मृत अर्भकाचा देह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आता अधिक तपास करत आहेत.

अर्भकाचा मृत्यू नक्की कशामुळे?

मिरज शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या महापालिका दवाखान्याच्या परिसरात अशी अमानवीय घटना घडल्याने आरोग्याच्या सुविधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. डॉक्टरांच्या मते अर्भक हे साधारणपणे तीन दिवसांचे असावे. आता शवविच्छेदन अहवालानंतरच अर्भकाचा मृत्यू नक्की कशामुळे झाला, हे स्पष्ट होणार आहे. मिरज शहर पोलीस या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी सर्व शक्यता पडताळून पाहत आहेत. दोषींना लवकरच शोधून काढू, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही दुदैर्वी घटना मिरज, जिल्हा सांगली येथे घडली आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या उपायुक्त स्मृती पाटील याबाबत बोलताना म्हणाल्या, "ड्रेनेज तुंबल्यामुळे सफाई सुरु करण्यात आली होती. त्यावेळी आम्हाला साधारण 7 वाजण्याच्या दरम्यान एक अर्भक सापडलंय. ते पुरुष जातीचे अर्भक आहे. ड्रेनेज विभागाच्या लोकांनी सांगितल्यानंतर ते अर्भक बाहेर काढण्यात आलंय. पोस्टमॉर्टेम करण्यासाठी ते सिव्हिल रुग्णालयात पाठवण्यात आलंय. येथील सर्व स्टाफची चौकशी पोलिसांमार्फत होईल. चौकशीनंतरचं यामागे काय घडलंय? ते समजेल."

आई भोंदू बाबाच्या जाळ्यात, मुलानं थेट शेवटच केला... सगळेच चक्रावले



जंगलात आढळला परदेशी बाबाचा मृतदेह

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 13 मे रोजी संदना परिसरातील नदीकाठच्या जंगलात एक अज्ञात मृतदेह आढळून आला होता. त्यानंतर तपासादरम्यान या मृतदेहाची ओळख सत्यनारायण यादव उर्फ परदेशी बाबा (रा. नजर नगर, मलिहाबाद, लखनऊ) अशी पटली. या खळबळजनक घटनेनंतर संदना पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करुन पोलिसांनी वेगाने तपास सुरु केला होता.

■येवला। प्रतिनिधी,

अनेक भोंदूबाबांची प्रकरणं बाहेर येत असतानाच एका भोंदूबाबाचीच हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. 'परदेशी बाबा' असं हत्या झालेल्या या तांत्रिकाचं नाव आहे. या हत्याकांड प्रकरणाचा पोलिसांनी छडा लावला असून मुख्य आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीच्या माहितीवरून गुन्ह्यात वापरलेला धारदार सुरा देखील जप्त केला आहे. नागेंद्र असं आरोपीचं नाव असून त्याला मलिहाबाद रेल्वे स्टेशनजवळून ताब्यात घेतले. उत्तर प्रदेशातील सीतापूर येथील ही घटना आहे.

का केली हत्या?

पोलीस चौकशीदरम्यान आरोपी नागेंद्रने आपला गुन्हा कबूल केला असून हत्येमागचे धक्कादायक कारण सांगितले आहे. नागेंद्रच्या आईवर परदेशी बाबा गेल्या 17-18 वर्षांपासून उपचार करत होता. बाबाने आपल्या आईला तंत्र-मंत्राच्या जाळ्यात अडकवून ठेवले आहे, असा संशय नागेंद्रला होता. याच कारणावरून सुमारे 6 महिन्यांपूर्वी त्याचा बाबासोबत वादही झाला होता. तेव्हापासूनच तो सूड उगवण्याची संधी शोधत होता आणि गेल्या दोन महिन्यांपासून तो हत्येचा कट रचत होता.

'अशी' केली हत्या

घटनेच्या दिवशी आरोपी नागेंद्र एका महिलेवर उपचार करण्याचे आणि त्याचे चांगले पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून बाबाला आपल्या दुचाकीवर बसवून जंगलात घेऊन गेला. तिथे त्याने सुऱ्याने गळा चिरून बाबाची निर्घृण हत्या केली. अंधश्रद्धेपोटी हत्येनंतर त्याने बाबाच्या हात आणि पायांमध्ये 11 खिळे ठोकले, जेणेकरून तांत्रिकाचा आत्मा भटकणार नाही, असा त्याचा समज होता. पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने स्वतःचे कपडे, बूट, हातमोजे आणि मृत बाबाचे साहित्य जाळून टाकले, तसेच मोबाईल फोन नदीत फेकून दिला. पोलिसांनी त्याची दुचाकी आणि हत्येचा सुरा जप्त केला असून पुढील कारवाई सुरू आहे.



आई सारखं 'परदेसी बाबा'कडे जायची, मुलाला चीड आली अन्...

गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या ह्यपरदेसी बाबाह्न हत्याकांडाचा पोलिसांनी अखेर पदार्फाश केला आहे. या गंभीर प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी नागेंद्र याला अटक केली असून, त्याने हत्या करण्यासाठी वापरलेले धारदार शस्त्रही जप्त करण्यात आले आहे. 13 मे रोजी संदना पोलीस ठाणे हद्दीत एक अज्ञात मृतदेह सापडला होता, ज्याची ओळख नंतर सत्यनारायण यादव उर्फ 'परदेसी बाबा' अशी पटली होती. तेव्हापासून पोलीस या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. तपासादरम्यान मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी आरोपी नागेंद्रला ताब्यात घेतले असून, त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. या हत्याकांडामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

महिला 18 वर्षांपासून परदेसी बाबाच्या संपर्कात

आरोपी नागेंद्रने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्याची आई गेल्या 18 वर्षांपासून परदेसी बाबाच्या संपर्कात होती. आईला बाबाने आपल्या तांत्रिक प्रभावाखाली वश करून ठेवले आहे, असा संशय आरोपीला होता. याच गोष्टीवरून तो गेली अनेक वर्षे अत्यंत अस्वस्थ होता. सुमारे सहा महिन्यांपूर्वी त्याने बाबांशी या विषयावर वादही घातला होता आणि आईला तांत्रिक प्रभावापासून दूर राहण्यास सांगितले होते, परंतु बाबांनी त्याचे ऐकले नाही. या वादाचे रूपांतर 12 मे रोजी अत्यंत हिंसक घटनेत झाले. रागाच्या भरात नागेंद्रने चाकूने गळा चिरून परदेसी बाबांची हत्या केली. पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपीने अत्यंत थंड डोक्याने मृतकाचे ओळखपत्र, स्वतःचे आणि मृतकाचे कपडे जाळून टाकले, तसेच मृतकाचा मोबाईल फोन शारदा नदीत फेकून दिला, जेणेकरून पोलिसांना काहीही सुगावा लागू नये.

पोलिसांच्या कसून तपासामुळे तो अखेर सापडलाच

आरोपीने गुन्ह्याचे सर्व पुरावे नष्ट करण्याचा पूर्ण प्रयत्न केला होता, मात्र पोलिसांच्या कसून तपासामुळे तो अखेर सापडलाच. सर्व तांत्रिक पुरावे आणि पुराव्यांची जुळवाजुळव केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असून, त्याला कारागृहात पाठवण्यात आले आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील संदना पोलीस ठाणे परिसरात घडली आहे.

कपड्यांच्या दुकानात घुसून प्रियकराची प्रेयसीला बेदम मारहाण

आधी लाथा-बुक्क्यांचा मारा... मग धरले पाय

■पिंपरी-चिंचवर्ड। प्रतिनिधी,

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमधून महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक संतापजनक आणि तितकीच धक्कादायक घटना समोर आली आहे. केवळ चारित्र्याच्या संशयावरून एका माथेफिरू तरुणाने आपल्या प्रेयसीला सार्वजनिक ठिकाणी गाठून अत्यंत अमानुषपणे मारहाण केली. एका कपड्यांच्या दुकानात घडलेला हा संपूर्ण प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या मारहाणीचा अस्वस्थ करणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून, अशा प्रवृत्तीच्या तरुणावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

पोलिसांची धाव, पण पीडित तरुणीचा तक्रार करण्यास नकार

हा भीषण व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून पोलिसांपर्यंत पोहोचताच, पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनाने तत्परता दाखवत तातडीने तपास चक्रावून थेट संबंधित तरुणीला गाठले. पोलिसांनी पीडित तरुणीला धीर देत गुन्ह्याची नोंद करून कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. परंतु, या ठिकाणी पोलिसांनाही धक्का बसला. स्वतःवर इतका मोठा अत्याचार होऊन आणि भरबाजारात मारहाण सहन करूनही, संबंधित तरुणीने आपल्या प्रियकराविरुद्ध कोणतीही पोलीस तक्रार देण्यास स्पष्ट नकार दिला. "हा आमचा खाजगी आणि अंतर्गत वाद आहे," अशी भूमिका घेत तिने कायदेशीर प्रक्रियेपासून लांब राहणे पसंत केले.

नागरिक आणि महिला संघटना आक्रमक

तरुणीने घेतलेल्या या नरमाईच्या भूमिकेमुळे पोलिसांसमोर आता मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. पीडित व्यक्तीने स्वतः तक्रार देण्यास नकार दिल्यामुळे पुढील पावले कशी टाकावीत, याबाबत पोलीस कायदेशीर सल्ला घेत आहेत. दुसरीकडे, या घटनेचा व्हिडिओ पाहून शहरातील नागरिक आणि विविध महिला संघटना कमालीच्या संतप्त झाल्या आहेत. "आज तक्रार नाही म्हणून अशा गुंडांना सोडून दिले, तर उद्या महिलांवर उघडपणे अत्याचार करण्याचे धाडस वाढेल," अशी भीती व्यक्त करत महिला संघटनांनी संबंधित माथेफिरू तरुणाला पोलिसांनी स्वतःहून (सुओ मोटो) गुन्हा दाखल करून धडा शिकवावा, अशी आग्रही मागणी केली आहे.



आधी क्रूरतेचा कळस, आणि नंतर...

व्हायरल झालेल्या सीसीटीव्ही फुटेजमधील दृश्ये अत्यंत भयानक आहेत. संशयाने पछाडलेला हा तरुण कपड्यांच्या दुकानात प्रवेश करतो आणि काहीही न बोलता थेट तरुणीवर हल्ला करतो. तो तिला दुकानातच ओढत आणून लाथा-बुक्क्यांनी आणि चापटांनी अत्यंत निर्दयीपणे मारहाण करू लागतो. मात्र, या थरारानंतर या घटनेत एक अजब वळण पाहायला मिळाले. तरुणीला बेदम झोडपल्यानंतर या विकृत तरुणाचा राग अचानक शांत झाला. त्याने त्याच दुकानाच्या फरशीवर गुडघे टेकले आणि थेट प्रेयसीचे पाय धरून तिची माफी मागण्यास सुरुवात केली. आधी अमानुष मारहाण आणि नंतर पाया पडण्याच्या त्याच्या या विचित्र वर्तनामुळे नेटीझन्स कमालीचे आश्चर्य व्यक्त करत आहेत.

तरुणाने भररस्त्यात महिलेचा मागून ड्रेस ओढला अन्...

तेलंगणातून माणुसकीला लाज आणणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तरुणाने एका महिलेचा भररस्त्यात विनयभंग केल्याप्रकरणी त्याला अटक केली आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहेत. सोशल मीडियावरील व्हायरल झालेल्या व्हिडिओने लोक संतप्त झाले असून या प्रकरणी आरोपीला अटकेची मागणी होताना दिसतेय.

तरुणाने महिलेचा मागून ड्रेस ओढत नको तेच...

घडलेल्या घटनेनुसार हे लज्जास्पद प्रकरण नरसिंह पोलीस ठाणे परिसरात, 14 मे 2026 रोजी दुपारी दीड वाजता उघडकीस आले. अकालापूर टाऊनशिप परिसरात तरुणाने एका महिलेचा मागून ड्रेस ओढत विनयभंग केला होता. ती महिला आपल्या अडीच वर्षांच्या मुलासोबत जवळच प्लेस्कूलमधून घरी परतता होती. आरोपी नराधमाने महिलेचा मागून ड्रेस ओढला आणि विनयभंग करून घटनास्थळावरून पळ काढला.

पीडितेनं केलेल्या तक्रारीच्या आधारे, नरसिंगी पोलिसांवर गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध घेण्यासाठी पथकांना कारवाईचे आदेश दिले. या प्रकरणी 50 ते 60 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फुटेज तपासल्यानंतर पोलिसांनी वड्डे नागराजू नावाच्या आरोपीचा शोध घेतला. तो गांधीपेट विभागातील पुपलागुडा येथील रहिवासी आहे.

वर्षीय बॉक्सरसोबत काय घडलं?

दरम्यान, देशभरात महिलांवर अन्याय अत्याचाराच्या घटना सातत्याने होताना दिसत आहेत. सार्वजनिक ठिकाणी दिवसाढवळ्या देखील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अल्पवयीन मुलीपासून तरुणी, तसेच विवाहित महिला ते वृद्ध महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com